रयत शिक्षण संस्थेचे,
एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर, पुणे २८.

**Performance Improvement Examination Form / परफॉर्मन्स इम्प्रुव्हमेंट परीक्षा अर्ज**

दि.५.८.२०२०

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रथम ते अंतिमपूर्व परीक्षांचे निकाल जाहीर केलेले आहेत. त्यामध्ये खालीलप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांना Performance Improvement चे परीक्षा अर्ज भरुन देणेसाठी कालावधी खालीलप्रमाणे असेल.

अ) ज्या परीक्षांचे निकाल दि.३१.०७.२०२० पर्यंत जाहीर झाले आहेत अशा विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरुन देण्याची मुदत दि.६.८.२०२० ते १६.०८.२०२० अशी असेल.

ब) ज्या परीक्षांचे निकाल दि. ५.८.२०२० नंतर जाहीर करण्यात येतील त्यांच्यासाठी अर्जाची मुदत निकाल जाहीर झाल्यानंतर तिस-या दिवशी सुरु होऊन पुढील दहा दिवस अशी राहील.

तरी ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरावयाचे आहेत त्यांनी विहित मुदतीमध्ये दि.१६.८.२०२० ऑनलाईन अर्ज भरावेत. सोबत परिपत्रक जोडले आहे.

1. सदरील परफॉर्मन्स इम्प्रोव्हमेन्ट परीक्षा अर्ज हे ऐच्छिक(Optional) स्वरूपाचे आहेत.
2. ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये संलग्न म्हणून महाविद्यालयात नियमित विद्यार्थी (Regular Student ), प्रवेश घेतलेला आहे व मे - जून २०२० परीक्षासाठी अर्ज केलेला आहे, तेच विद्यार्थी परफॉर्मन्स इम्प्रुव्हमेंट परीक्षा अर्ज भरणेसाठी पात्र समजण्यात येतील.
3. ज्या विद्यार्थ्यांचे सम सत्रातील (द्वितीय, चतुर्थ इ .) मे - जून २०२० परीक्षाचे निकाल गणितीय सूत्र वापरून जाहीर करण्यात आले आहेत आणि जे विद्यार्थी या निकालानंतर एक किंवा अनेक विषयांच्या गुणाबाबत असमाधानी आहे त्यांच्यासाठी सदर परीक्षेची ऐच्छिक(Optional ) सुविधा देण्यात आलेली आहे.
4. सदरील परीक्षेसाठी कोणतेही वेगळे परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.तसेच या परीक्षेसाठी Special Examination (विशेष परीक्षा ) सुविधा देण्यात येणार नाही.
5. सदर परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यर्थाचे गुणपत्रक परफॉर्मन्स इम्प्रुव्हमेंट परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर देण्यात येईल.
6. सदर परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना परफॉर्मन्स इम्प्रुव्हमेंट परीक्षेच्या निकालानंतर प्राप्त होणारे गुणदान हे उन्हाळी २०२० च्या परीक्षेचे अंतीम गुणदान राहतील.

डॉ.अरविंद बुरुंगले,
प्राचार्य,
एस.एम. जोशी कॉलेज, हडपसर, पुणे २८.

Scanned with CamScanner